# करिअर कट्टा पोर्टलवरील महाविद्यालय नोंदणी




करिअर कट्टा हा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेला एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या उपक्रमाचा उद्देश महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि विविध शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे हा आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांपर्यंत विविध उपक्रमांची माहिती पोहोचवून त्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.

या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे करिअर कट्टा पोर्टल. हे पोर्टल महाविद्यालय, प्राचार्य, समन्वयक आणि विद्यार्थी यांना एकत्र जोडणारे एक डिजिटल व्यासपीठ आहे. या पोर्टलवर नोंदणी प्रक्रिया सुलभ आणि पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने केली जाते, ज्यामुळे कामकाज अधिक जलद आणि कार्यक्षम बनते. सर्वप्रथम महाविद्यालयाची रजिस्ट्रेशन प्रोसेस पूर्ण केली जाते. या टप्प्यात महाविद्यालयाची मूलभूत माहिती, अधिकृत ई-मेल आयडी आणि संपर्क तपशील भरले जातात. ही माहिती योग्यरित्या नोंदविणे आवश्यक असते, कारण पुढील सर्व प्रक्रिया यावर आधारित असतात.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर कॉलेज डॅशबोर्ड अक्टिवेशन पेज द्वारे महाविद्यालयाचा डॅशबोर्ड सक्रिय केला जातो. डॅशबोर्ड सक्रिय झाल्यानंतर महाविद्यालयाला पोर्टलवरील विविध सुविधांचा वापर करण्याचा अधिकार मिळतो. त्यानंतर महाविद्यालयातील प्राचार्य आणि समन्वयक यांची स्वतंत्र नोंदणी केले जाते. त्यांना लॉगिन माहिती दिले जातात, ज्याद्वारे ते पोर्टल मध्ये प्रवेश करून त्याचा वापर करू शकतात. पुढील टप्प्यात समन्वयकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची माहिती पोर्टल वर अपलोड केली जाते. या माहितीमध्ये विद्यार्थ्यांचे नाव, वर्ग, ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक यांचा समावेश असतो. या प्रक्रियेमुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची स्वतंत्र नोंद तयार होते आणि त्यांना लॉगिन एक्सेस दिला जातो. लॉगिन केल्यानंतर विद्यार्थी पोर्टल वरील विविध सुविधा आणि इतर उपक्रमांचा लाभ घेऊ शकतात.

या पोर्टल वरील महाविद्यालय, समन्वयक व प्राचार्य नोंदणीमुळे उपक्रमांचे नियोजन, समन्वय व अंमलबजावणी प्रभावीपणे करता येते. करिअर कट्टा पोर्टल मध्ये सर्व माहिती, सूचना आणि अपडेट्स एकाच ठिकाणी उपलब्ध होतात आणि उपक्रमांची अंमलबजावणी व्यवस्थित पद्धतीने पार पडते. याशिवाय, करिअर कट्टा अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध कोर्सेस, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यक्रम आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते रोजगार तसेच स्वयंरोजगारासाठी सक्षम बनतात. अशा प्रकारे, करिअर कट्टा पोर्टल हे केवळ नोंदणीचे माध्यम नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि वैयक्तिक विकासासाठी एक सर्वसमावेशक आणि प्रभावी डिजिटल साधन ठरते.

★ ★ ★


COLLEGE ONBOARDING PROCESS (SOP)
Follow these simple steps to onboard your college on CareerKatta
1
ENTER AISHE CODE
• Enter your institution's AISHE Code.
• System fetches & verifies college details automatically.
AISHE CODE
2
VERIFY COLLEGE DETAILS
• Check college name and basic information.
• Confirm correctness before proceeding.
3
ADD CONTACT DETAILS
• Enter / confirm:
• Mobile Number • Email ID • Postal Address
4
OTP VERIFICATION
• Verify using One-Time Password (OTP).
• Ensure secure authentication.
OTP
5
SET PASSWORD
• Create a secure login password.
• Use email ID & password for future login.
6
COLLEGE LOGIN
• Login using registered Email ID & Password.
• Enter Principal Details and Coordinator Details.
PRINCIPAL DETAILS
COORDINATOR DETAILS
7
GET YOUR AFFILIATION CERTIFICATE
Affiliation Certificate will be:
Sent via Email
Available on College Dashboard
Downloadable anytime
SCAN & GET ONBOARDED!
Scan this QR code to start your College Onboarding
WHY ONBOARD?
Access Training & Resources
Manage Student Data
Get Affiliation Certificate
Stay Updated with Latest Opportunities
HELPDESK SUPPORT
For any issues during the onboarding process, contact our support team.
7507652555
CareerKatta – Empowering Colleges, Enriching Careers
www.careerkatta.in